# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-३७

जा.क्र. : प्रशा/व्य.मं./२०१६/ दि. ३१ डिसेंबर २०१६

**कार्यवृत्तांत**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची सभा बुधवार दि. २८ डिसेंबर २०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे-३७ येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. दीपक ज. टिळक, कुलगुरु (अध्यक्ष)
२. डॉ. गीताली हृषिकेश मोने-टिळक, अधिष्ठाता, आधुनिकशास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये अभ्यासमंडळ
३. डॉ. बा.शि.दामले, अधिष्ठाता, आरोग्यशास्त्र मंडळ
४. डॉ. मा. चिं. दीक्षित, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
५. डॉ. श्री. ग. बापट, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
६. डॉ. श्रीपाद भट, प्राध्यापक प्रतिनिधी
७. डॉ. माधवी रेणावीकर, सहयोगी प्राध्यापक प्रतिनिधी
८. सौ. प्रणति टिळक, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी.
९. डॉ. अभिजीत जोशी, प्रभारी कुलसचिव, (सचिव)

डॉ. हेमंत अभ्यंकर व श्रीमती सरीता साठे सभेस उपस्थित राहू शकणार नसल्याचे कळविले.

सध्याच्या व्यवस्थापन मंडळाचा कार्यकाल १२ जानेवारी २०१७ रोजी संपत आहे. मा. कुलगुरू यांनी व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी आत्तापर्यंत विद्यापीठास केलेल्या मार्गदर्शन व दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले व यापुढेही विद्यापीठास त्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य असेच मिळत राहील अशी अपेक्षा व्यक्त केली.

विद्यापीठाच्या सप्टेंबर २०१६ मधे झालेल्या लेखापरिक्षणाचा अहवाल आला असून त्यावर विद्यापीठाचे म्हणणे मांडण्याचे काम मा. कुलपती यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. ते लवकरच आपणासमोर मांडण्यात येईल व यू.जी.सी ला पाठविण्यात येईल. या विषयी तपशीलवार चर्चा झाली.

१) व्यवस्थापन मंडळाची मागील सभा दि. १८ नोव्हेंबर २०१६ रोजी झाली. त्या सभेचा कार्यवृत्तांत संमत करणे व केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२०९**
कार्यवृत्तांत संमत करण्यात येत असून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

२) ६व्या वेतन आयोग लागू होण्यापूर्वी विद्यापीठ कर्मचाऱ्यांना विद्यापीठाकडून दिल्या गेलेल्या अग्रीम रक्कमेची वसूली करण्याबाबत कर्मचाऱ्यांना पत्रे दिली होती. त्या पत्रांना कर्मचाऱ्यांकडून उत्तरादाखल येत असलेल्या पत्रांबाबत निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१०**

- जे कर्मचारी निवृत्त झाले आहेत त्यांच्याकडून रू.१०,०००/- टप्याटप्याने वसूल करण्यात यावेत.
- जे कर्मचारी नजीकच्या काळात निवृत्त होणार आहेत त्यांच्या निवृत्तीस किती कालावधी उरला आहे ते पाहून वित्त विभागाने सदर रक्कम त्यांच्याकडून वळती करून घ्यावी.
- इतरांच्या मासिक वेतनातून दरमहा रू.५००/- प्रमाणे कपात करण्यात यावी.

३) राज्य सरकारने केंद्र सरकारप्रमाणेच, पुण्यातील शासनमान्य सरकारी कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाच्या ३०% घरभाडे भत्ता देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत विचार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२११**

शासनमान्य पदांसाठी शासन निर्णयाप्रमाणे, शासनाने प्रत्यक्ष रक्कम दिल्यावर पुढील कार्यवाही करावी तसेच विद्यापीठाच्या इतर सेवकांचे बाबतीत विद्यापीठ न्यासाने निर्णय घ्यावा. सदर विषय विद्यापीठ न्यासाकडे वर्ग करण्यात यावा.

४) विद्यापीठातील आयुर्वेद, फिजीओथेरपी व नर्सिंग हे वैद्यकीय शिक्षणाशी निगडीत विभागांनी सुचविल्याप्रमाणे विद्यापीठाचे स्वत:चे रुग्णालय सुरू करण्याबाबत फिजीओथेरपी विभागप्रमुखांनी दिलेल्या प्रस्तावाबाबत विचार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१२**

विद्यापीठ रुग्णालयास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे व त्यासंबंधी पुढील दिशा ठरविण्याचे सर्वाधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात येत आहेत.

५) आपल्या विद्यापीठातून संस्कृत विषयात विद्यावाचस्पती केलेल्या डॉ. अपर्णा जोशी यांनी दिलेल्या रू. १,००,०००/- या रक्कमेच्या व्याजाचा उपयोग संस्कृत विभागातर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी करण्यात यावा, याबाबत विचार करणे व निर्णय घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१३**

सदर निधी राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी वापरण्यापेक्षा संस्कृत विभागाच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने आवश्यकतेप्रमाणे वापरावा.

६) डॉ. विशाल जाधव यांनी त्यांच्या दि. ०८.१०.२०१६ पासून दोन वर्षांसाठी धारणाधिकाराबाबत दिलेल्या विनंती अर्जाचा विचार करणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१४**

डॉ. विशाल जाधव यांना सध्या १ वर्षाचा धारणाधिकार देण्यास मंजूरी देण्यात आली. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

७) सन २०१७ च्या शासनमान्य सुट्ट्यांच्या यादीस मान्यता देणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१५**

२०१७ च्या शासनमान्य सुट्ट्यांच्या यादीस मान्यता देण्यात आली.

८) टि.म.वि. सोलापूर येथील समाजकार्य विभागासाठी सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी दि. २३.१२.२०१६ रोजी झालेल्या मुलाखतींतून निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवाराबद्दल माहिती देणे व निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१६**

टि.म.वि. सोलापूर येथील समाजकार्य विभागासाठी सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी दि. २३.१२.२०१६ रोजी झालेल्या मुलाखतींतून निवड समितीने शिफारस केलेल्या १) श्री जावेद नागरे व २) श्री प्रशांत गायकवाड यांच्या नेमणूकीस मान्यता देण्यात आली.

९) सातारा व पाचगणी येथील जमीन विद्यापीठाच्या नावे हस्तांतरीत करण्याच्या कामी आलेल्या जादाच्या रू.९,२७,०००/- रक्कमेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१७**

सातारा व पाचगणी येथील जमीन विद्यापीठाच्या नावे हस्तांतरीत करण्याच्या कामी आलेल्या जादाच्या रू.९,२७,०००/- रक्कमेस मान्यता देण्यात आली.

१०) विद्यापीठातून जे विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडले आहेत त्यांना काही काळानंतर त्यांच्या **गुणपत्रिकांमधील पूर्ण नावामधे त्रुटी असल्यास** व त्यांना त्यामधे दुरूस्ती करून हवी असल्यास, त्यांच्याकडून तशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र व रू. २०००/- प्रक्रिया शुल्क आकारून, बदल करून देण्याबाबत विचार करणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१८**

प्रस्ताव मान्य. प्रक्रिया शुल्काबाबत वेळोवेळी मा. कुलगुरू यांचे मार्गदर्शन घ्यावे. परंतु सदर दुरूस्तीसाठी सध्या रू.२,०००/- इतके शुल्क आकारण्यात यावे.

**विद्वन्मंडळाने शिफारस केलेले खालील विषय :**

११) विविध अभ्यासमंडळांतर्गत होणाऱ्या विविध कोर्सेसच्या परिक्षा तारखा, परिक्षा केंद्र यांना परिक्षामंडळ आणि विभागाकडून आलेली माहिती यांच्या संगमताने दिलेल्या परिक्षा नियोजनास मान्यता देणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१९**

प्रस्ताव मान्य.

१२) विविध अभ्यासक्रमांच्या मे २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या परीक्षांकरिता सभेचेवेळी सादर केलेली प्रश्नपत्रिका संपादक (Paper Setters), परीक्षक (Examiners), पुनर्परीक्षक (Moderators) यांची यादी मान्यता देणेबाबत

**ठराव : व्य.मं.२०१६-२२०**
प्रस्ताव मान्य.

१३) जपान येथील विद्यापीठाने दिलेले क्रेडिटस् जसेच्या तसे टिमवि मध्ये ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात यावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२१**
प्रस्ताव मान्य.

१४) व्यवस्थापन मंडळास शिफारस करण्यात येते की, संगीत पदविका अभ्यासक्रमात बासरी (Flute) हा वैकल्पिक विषय ठेवण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२२**
शिफारसीस मान्यता.

१५) साहित्य व ललीतकला अभ्यासमंडळांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून मोडी लिपीचा प्रगत अभ्यासक्रमास मान्यता देणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२३**
प्रस्ताव मान्य.

१६) बहि:स्थ एम.ए. सामाजिक शास्त्रे चतुर्थ सत्र आणि बी.ए. सामाजिक शास्त्रे सहावे सत्र या अभ्यासक्रमांमधील Dissertation विषय काढून टाकून त्याऐवजी Research Methodology हा लेखी पेपर समाविष्ट करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२४**
प्रस्ताव मान्य.

१७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या अभ्यासक्रमामध्ये बदल करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२५**
प्रस्ताव मान्य.

१८) बी.लिब. अभ्यासक्रमाच्या (नियमित व बहिस्थ)परीक्षा पेपर पॅटर्न मध्ये बदल करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२६**
प्रस्ताव मान्य.

१९) तात्त्विक आणि सामाजिकशास्त्रे अभ्यासमंडळांतर्गत एम.ए. तत्वज्ञान अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२७**
प्रस्ताव मान्य.

२०) तात्त्विक आणि सामाजिकशास्त्रे अभ्यासमंडळांतर्गत बी.ए अर्थशास्त्र आणि बी.ए इतिहास अभ्यासक्रमातील विषय बदलण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२८**

प्रस्ताव मान्य.

२१) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात National Skill Development Corporation चे माध्यमातून Certificate Course in Clinical Nutrition हा अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२९**

प्रस्ताव मान्य.

२२) व्यवस्थापन मंडळास शिफारस करण्यात येते की, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात अभ्यंगमर्दन तंत्र पदविका अभ्यासक्रमामध्ये बदल करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३०**

प्रस्ताव मान्य.

२३) व्यवस्थापन मंडळास शिफारस करण्यात येते की, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या Feedback नुसार तसेच Nutrition Practioner आणि IDA च्या पद्धतीनुसार M.Sc. in Nutrition & Food Science या अभ्यासक्रमामध्ये बदल करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३१**

प्रस्ताव मान्य.

२४) जनता सहकारी बँक, पुणे यांचेकडून आयुर्वेदाच्या संशोधनाकरीता Project- Study to evaluate Nutritional Value Physiochemical & Organoleptic Property acceptability and stability of different Cow's Curd based nutritional product) संशोधनाचा आराखडा आणि अंदाजपत्रक यांस मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३२**

प्रस्ताव मान्य.

२५) मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमामधील BAJMC (First Year I sem.) MAMC (First Year First Sem.); या अभ्यासक्रमांची परिक्षा पध्दती ४०-६० (40% External & 60% Internal) याप्रमाणे करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३३**

प्रस्ताव मान्य.

२६) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये आधुनिक शास्त्रे अभ्यासमंडळांतर्गत बी.एफ.ए.(Design) हा अभ्यासक्रम सुरू करण्यास करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३४**

प्रस्ताव मान्य.

२७) आरोग्यशास्त्र अभ्यासमंडळांतर्गत बी.एस.सी. नर्सिंग तृतीय वर्षामध्ये Research Methodology हा विषय समाविष्ठ करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३५**

प्रस्ताव मान्य.

२८) आरोग्यशास्त्र अभ्यासमंडळांतर्गत बी.पी.टी. प्रथम वर्षामध्ये Yoga Therapy या विषयाचा समावेश करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३६**

प्रस्ताव मान्य.

२९) बी. एस्. सी. नर्सिंग अभासक्रमाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये सध्या ३० बहुपर्यायी प्रश्न (Multiple Choice Questions) आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण आहे. त्यात बदल करून प्रश्नपत्रिकेमध्ये १५ Multiple Choice Questions असावेत आणि प्रत्येक प्रश्नास १ गुण देण्यात यावा. Internal आणि Term – end परीक्षेतही Multiple Choice Questions चा अंर्तभाव करण्यात यावा. यास मंजूरी मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३७**

प्रस्ताव मान्य.

३०) व्यवस्थापन विभागांतर्गत पीएच.डी /एम.फिल कोर्सवर्क परीक्षा पध्दतीमध्ये (६०:४० Pattern) याप्रमाणे बदल करण्यास यावर्षीकरीता मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३८**

प्रस्ताव मान्य.

३१) बी.बी.ए आणि एम.बी.ए अभ्यासक्रमामध्ये खालील विषय समाविष्ठ करण्यास मान्यता मिळावी.

1. BBA15-416 Leadership Skills and Team Building for BBA IV Sem
2. MHR-401 Leadership and Decision Making Skills for MBA IV Sem
3. MBA-406 Current Trends in Management for MBA IV Sem

**ठराव : व्य.मं.२०१६-२३९**

प्रस्ताव मान्य.

३२) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून व्यवस्थापन विभागाच्या पीएच.डी अभ्यासक्रमामध्ये विशेष विषय (Marketing , HR, Finance) समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आली. सदर शिफारसीस मान्यता मिळणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२४०**

शिफारसीस मान्यता.

३३) व्यवस्थापन अभ्यासमंडळाच्या अंतर्गत हॉटेलमॅनेजमेंट अभ्याक्रमामधे पूर्व लेखी परीक्षेचे गुण हे प्रत्येक विषयासाठी २० राहतील व त्यानुसार २०१६-१७ च्या उन्हाळी परीक्षा घेतल्या जातील. सध्याच्या विद्यापीठाच्याक्षेत्रमानांकन गुणपध्दतीमध्ये अभ्यासक्रमाच्या विविध अंगाचे मूल्यमापन हे ४० टक्के गुणांतर्गत होत असते, त्यामुळे पूर्व लेखी परीक्षा ही २० गुणांची असावी. याप्रमाणे बदल करण्यास यावर्षीकरीता मान्यता मिळणेबाबत विचार करण्यात आला. सदर बदल हा केवळ बदल हा केवळ हॉटेल मॅनेजमेंट या विभागापूरताच मर्यादित राहील आणि याची अंमलबजावणी व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने जून २०१७ पासून नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच लागू राहील

**ठराव : व्य.मं.२०१६-२४१**

प्रस्ताव मान्य.

३४) विधी अभ्यासमंडळांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून एल.एल.एम. हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतच्या शिफारसीस मान्यता मिळणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२४२**

शिफारसीस मान्यता.

३५) विधी अभ्यासमंडळांतर्गत खालील अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत मान्यता मिळावी.

- Post Graduate Diploma in Taxation
- Post Graduate Diploma in Labour Law
- Post Graduate Diploma in Cyber Law

**ठराव : व्य.मं.२०१६-२४३**

प्रस्ताव मान्य.

३६) विधी अभ्यासमंडळांतर्गत २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात ज्या विद्यार्थ्यांची B.A.LLB. (5 Years) अभ्यासक्रमाची तीन वर्षे पूर्ण झाली आहेत अशा विद्यार्थ्यांना Bachelor of Academic Laws ही पदवी देण्यात यावी. तसेच पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर Bachelor of Laws दुसरी पदवी देण्यात यावी, सदर शिफारसीस मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२४४**

शिफारसीस मान्यता.

३७) विधी अभ्यासमंडळांतर्गत ज्या विद्यार्थ्यांची B.A.LLB (5 Years) अभ्यासक्रमाची तीन वर्षे पूर्ण झाली आहेत अशा विद्यार्थ्यांनाच B.A.LLB अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षात प्रवेश देण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांचे आधीचे काही विषय राहिले असल्यास त्यांना चौथ्या वर्षात प्रवेश देण्यात येवू नये. सदर नियम शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून लागू करण्यात यावा. सदर शिफारसीस मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२४५**

शिफारसीस मान्यता.

३८) शैक्षणिक वर्ष २०१६ - १७ पासून एम.एस.डब्ल्यू अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे क्षेत्रियकार्य हे (Block Field Work) या पध्दतीने करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२४६**

प्रस्ताव मान्य.

३९) एम.एस.डब्ल्यू अभ्यासक्रमातील संशोधन प्रकल्प अहवाल या विषयाचे अंतर्गत मूल्यांकनाची विभागणी खालीलप्रमाणे करण्यास विद्वनमंडळाने शिफारस केली आहे. सदर शिफारसीस मान्यता मिळावी.

विषयांचे अंतर्गत मूल्यांकन १०० गुणांचे असून त्याची विभागणी खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ४० गुण - | संशोधन कार्यशाळा | - सहभाग | २० गुण |
| | | - उपस्थिती | २० गुण |
| ६० गुण - | संशोधन प्रस्ताव | | २० गुण |
| | संदर्भ साहित्यआढावा | | २० गुण |
| | संशोधनाचे साधन | | २० गुण |

सत्र क्र ४ मध्ये सदर विषयाचे अंतर्गत मूल्यांकन १०० गुणांचे असून त्याची विभागणी खालीलप्रमाणे :

**४० - गुण अंतर्गत मूल्यांकन**

| | |
|---|---|
| - तथ्य संकलन, विश्लेषण आणि निर्वचन | २० गुण |
| - सूचना | १० गुण |
| - मार्गदर्शन तासिका उपस्थिती | १० गुण |

**६० गुण - बर्हिगत मूल्यांकन**

| | |
|---|---|
| - विषयाचा समाजकार्याशी सहसंबंध | १० गुण |
| - संदर्भ साहित्य आढावा | १० गुण |
| - तथ्य संकलन आणि विश्लेषण | १० गुण |
| - सूचना | १० गुण |
| - सादरीकरणाचे कौशल्य | १० गुण |
| - अहवाल लेखन | १० गुण |

**ठराव : व्य.मं.२०१६-२४७**

प्रस्ताव मान्य.

४०) एम.एस.डब्ल्यु. अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाच्या चतुर्थ सत्रातील "आदीवासी, ग्रामीण आणि नागरी समुदाय विकास" या विषेश शाखेतील एका विषयाचे पाठ्यक्रम अद्ययावत करून बदलले आहेत. त्याकरीता मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२४८**

प्रस्ताव मान्य.

४१) प्र. कुलगुरू (Pro Vice Chancellor), परिक्षा नियंत्रक (Controller of Examinations), शैक्षणिक संचालक (Academic Director), प्रशासकीय संचालक (Administrative Director), उपकुलसचिव (Dy. Registrar) आणि सहाय्यक कुलसचिव (Assistant Registrar) सदर पदे भरण्याबाबत मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२४९**

प्रस्ताव मान्य.

४२) विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभामध्ये मा.कुलपती यांच्या निर्देशान्वये सन्मानिय विद्यानिधी पदवी : १) श्री.संभाजीराव भिडे गुरूजी, सांगली- शिवप्रतिष्ठान, अध्यक्ष २) ख्यातनाम आयुर्वेद तज्ञ वैद्य प.य तथा दादा खडीवाले, पुणे यांच्या नावांना मा.कुलपती यांनी मान्यता दिली आहे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५०**

प्रस्ताव मान्य.

४३) व्यवस्थापन मंडळास शिफारस करण्यात येते की, परीक्षा मंडळाची शिफारस आणि परीक्षकांचे अहवाल या निकषान्वये प्रा.सौ.गीताली मोने- टिळक यांना शैक्षणिक विद्यानिधी पदवी बहाल करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५१**

शिफारसीस मान्यता.

४४) परीक्षा मंडळाच्या शिफारसीनुसार तसेच विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करून जे विद्यार्थी अंतिम परीक्षेत काही गुणांमुळे विशिष्ठ श्रेणी प्राप्त करण्यासाठी पात्र होत नाहीत त्यांच्या एकूण गुणांमध्ये एक टक्यापर्यंत गुण वाढविण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५२**

प्रस्ताव मान्य.

४५) Lapses Committee स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली तसेच त्याचे कामकाज पाहण्याकरीता अध्यक्ष डॉ.प्रणति टिळक आणि परीक्षा विभाग प्रमुख यांच्या नावांना मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५३**

प्रस्ताव मान्य.

४६) पीएच.डी प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा विचार, संशोधन प्रकल्प, संशोधन पेपर यांचा विचार करून पीएच.डी समितीने मार्गदर्शकाच्या आलेल्या अर्जाची शिफारस व्यवस्थापन मंडळाकडे करावी व पुढे मा. कुलगुरूंच्या मान्यतेने त्यांची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करावी. सदर प्रस्तावास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५४**

प्रस्ताव मान्य.

४७) एम.फिल. अभ्यासक्रमाचे परीक्षा अटेम्प्टस् (Attempts), पुर्नप्रवेश, त्याचे नियम, कालावधी याबाबत विचार विनियम करण्यासाठी समिती गठित करण्यासाठी मान्यता देण्यात आली. सदर समिती डॉ.मा.चिं.दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५५**

प्रस्ताव मान्य.

४८) विविध अभ्यासमंडळांतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांमधील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये आयोजित आणि प्रस्तावित कार्यशाळा, चर्चासत्रे, परिसंवाद, राष्ट्रीय परिषद याच्या तपशीलास मान्यता मिळावी.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५६**

प्रस्ताव मान्य.

**मा. अध्यक्षांच्या संमतीने आयत्यावेळचे विषय....**

४९) सहाय्यक कुलसचिव या शासनमान्य पदासाठी दि. २७.१२.२०१६ रोजी झालेल्या मुलाखतींमधून निवड समितीने निवड केलेल्या उमेदवाराबद्दल माहिती देणे व निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५७**

निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे गुणवत्तेनुसार क्र. १ चे उमेदवार डॉ. जयवंत रामचंद्र पाटील यांचा मागील पाच वर्षांचा गोपनीय अहवाल मागविण्यात यावा व त्यानंतर त्याबाबत पुढील निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.

५०) शासनमान्य कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या अनुदानापोटी शासनाकडून रक्कम मिळण्यास अनेकदा बराच विलंब होत असतो. अश्या वेळी शासनमान्य कर्मचाऱ्यांचे वेतन कसे व केव्हा करावे याबाबत विचार करणे व निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५८**

प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत शासनाकडून वेतनासाठी रक्कम प्राप्त होते का ते पहावे अन्यथा शासनमान्य कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेस करण्यात यावे. तसेच वेतनासाठीची रक्कम शासनाकडून मिळण्यास एक महिन्यापेक्षा विलंब होतो आहे असे लक्षात आल्यास सदर बाब व्यवस्थापन मंडळाच्या निदर्शनास आणून द्यावी व व्यवस्थापन मंडळाच्या मार्गदर्शनानुसार मुख्य लेखापाल यांनी पुढील

कार्यवाही करावी. सदर निर्णय मा. संचालक व मा. सहसंचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, पुणे व सर्व शासनमान्य कर्मचारी यांना कळविण्यात यावा.

५१) कॉम्प्युटर सायन्स विभागाकडून आलेल्या प्रस्तावानुसार २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून नवीन "BCA Program with specialisation in Game Software Development" सुरू करण्याबाबत विचार करणे व निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२५९**

प्रस्ताव मान्य.

डॉ. अभिजीत जोशी
प्रभारी कुलसचिव

डॉ. दीपक ज. टिळक
अध्यक्ष